**पुष्प – ५ : भागवत धर्म**

**करूं भागवत धर्म**

१. भागवत धर्म म्हणजे काय...? : भागवत धर्मविचाराचा उगम.

२. महर्षी व्यासरचित भागवत पुराण : व्यासांची ओळख : भागवत पुराणाची निर्मिती.

३. श्रीमद्‍भागवत आणि श्रीमद्‍भगवद्‍गीता : भागवत धर्मविचार सांगणारे दोन ग्रंथ.

४. श्रीमद्‍भागवत उद्धवांना सांगितले : श्रीमद्‍भगवद्‍गीता अर्जुनाला सांगितली.

✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻✻

**संतबोल**

- आम्हां सांपडलें वर्म। करूं भागवत धर्म।। (श्रीनामदेवराय)
- भागवतधर्माची निजस्थिती। मन बुद्धि चित्त अहंकृती।
  आदिकरूनि इंद्रियवृत्ती। भगवंतीं अर्पिती तें ऐक।। (ए.भा. २.३५०)
- तें हें राया भागवत जाण। मुख्यत्वें भक्तिप्रधान।
  भावें करितां भगवद्‍भजन। अज्ञान जन उद्धरती।। (ए.भा. २.३१८)
- अभिमान लागे शुकाचिये पाठी। व्यासें उपराटी दृष्टी केली।। (श्रीतुकोबाराय)
- स्वाभाविक जें वर्तन। तें सहजें होय ब्रह्मार्पण।
  या नांव शुद्ध आराधन। भागवत धर्म पूर्ण जाण राया।। (ए.भा. २.४५३)

## मंजिरी – ५

१. भागवत धर्म : संकल्पनेच्या अर्थाचे तीन आयाम.
२. व्यास आणि शुकदेव यांचा परिचय.
३. भागवत धर्माने प्रतिपादन केलेले भक्तितत्व.
४. विश्वाची सेवा म्हणजेच विश्वंभराची सेवा.
५. विश्वंभरच विश्वरूपाने प्रगटलेला आहे.

************************************************

## संतबोल

- हें भागवत नव्हे नव्हे। अज्ञानालागीं निज पव्हें।
  भवाब्धी तरावया भजनभावें। महानाव देवें निर्माण केली।। (ए.भा. २.३१९)
- स्त्रीशूद्रादी आघवे। घालूनियां ये नावे। एकेच खेपे स्वयें न्यावे। भजनभावें परतीरा।। (ए.भा. २.३२१)
- हें समस्तही श्रीवासुदेवो। ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भावो।
  म्हणोनि भक्तांमाजीं रावो। आणि ज्ञानिया तोचि।। (ज्ञा. ७.१३६)
- साकर दिसे परि गोडी न दिसे। ते काय त्या वेगळी असे। तैंसा जनीं आहे जनार्दन।
  तयातें पहावया सांडीं अभिमान।। (श्रीनाथराय)
- सर्व हरी हरी बाह्य अभ्यंतरीं। एक चराचरी आत्माराम।। (श्रीसोपानदेव)